**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**निशाणी २५**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – मधुकर जगन्नाथ चव्हाण

माझे वय – ६२ वर्षे,

व्यवसाय – व्यापार

रा.ने. – कुंभारमठ, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी अभियोक्ता श्री. टी.ए.भणगे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

०१. दि. ०८/१२/२०२३ रोजी पोलीसांनी मला सागरी महामार्गावरती जयअंबे बंगल्याच्यासमोर अपघात झाल्यामुळे मला पंचनाम्यावरती सही करण्यासाठी बोलविले होते. पंचनामा माझ्या समक्ष झाला होता. त्या ठिकाणी एक वाहन मालवणकडून वेंगुर्लेकडे जात होते. दुसरे वाहन वेंगुर्लेकडून मालवणकडे जात होते. दोन्ही वाहन समोरासमोर एकमेकाला आपटले होते. मला अपघात झालेल्या वाहनांचे क्रमांक सांगता येणार नाहीत. पोलीसांनी पंचनामा माझ्या समक्ष लिहून त्यावर माझी सही घेतली होती. अपघातस्थळावरील रस्ता दक्षिण उत्तर होता. वेंगुर्ला हे दक्षिणेकडील रस्त्यावरती व मालवण उत्तरेकडील रस्त्यावरती आहे. अपघात हा रस्त्याच्या मधोमध झालेला होता. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावार अ.क्र. १ ला माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आणि बरोबर आहे. त्यास निशाणी **पी१/पी.डब्ल्यू १** दिली आहे. घटनास्थळावरती फोटो काढण्यात आले होते. मला आता एकूण आठ फोटो दाखविण्यात आले. सदरचे फोटो माझ्यासमक्ष काढलेले आहेत. सदरचे फोटो हे घटनास्थळावरील आहेत.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.नाईक यांचे मार्फत.**

०२. मला पंचनाम्याला हजर राहण्यासाठी पोलीसांनी लेखी पत्र दिले नव्हते.हे माझ्या लक्षात नाही की, पंचनामा किती वाजता सुरु झाला होता व किती वाजता संपला होता.

माझे घर ते घटनास्थळ यामध्ये एक किलोमिटर अंतर आहे. माझ्या घरापासून घटनास्थळावर जाण्यासाठी मोटरसायकलने पाच ते सात मिनिटे लागतात. माझ्या घरापासून घटनास्थळावर चालत जाण्यासाठी दहा मिनिटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यासाठी किती लोक हजर होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा एक पोलीस अधिकारी सांगत होता व दुसरा पोलीस अधिकारी लिहित होता. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना पंचनाम्यातील मजकूर सांगितला त्याप्रमाणे पोलीसांनी लिहून घेतला असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे , त्यामुळे त्या ठिकाणी लोकांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत.हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्यावेळेस आरोपी हजर नव्हता.

०३. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या कोऱ्या फॉर्मवरती सहया घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरती फोटो काढले होते हे मी खोटे सांगत आहे. फोटो काढणाऱ्या व्यक्तीचे नाव मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.

दिनांक : १६/०७/२०२४